प्रेस नोट

दिनांक २२/०९/२०२०

| | |
|---|---|
| असीबी | रत्नागिरी युनिट |
| आरोपी लोकसेवक | १) श्री.पुष्पक केरबा भिसे,वय -४७ वर्षे, पद- वैदयकिय अधिकारी(वर्ग-२), प्राथमिक आरोग्य केन्द्र, जवळेथर ता. राजापूर, जि. रत्नागिरी. |
| घटनेचे ठिकाण | प्राथमिक आरोग्य केन्द्र, जवळेथर, ता. राजापूर जि. रत्नागिरी येथे |
| मागितलेली लाचेची रक्कम | ५,५००/- रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | स्विकारलेली लाचेची रक्कम ५,५००/- रुपये |
| थोडक्यात हकिगत | यातील तक्रारदार हे रत्नागिरी येथील ओमसाई स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित तर्फे प्राथमिक आरोग्य केन्द्र, जवळेथर, ता. राजापूर जि. रत्नागिरी येथे कंत्राटी वाहन चालक म्हणुन तात्पुरती नेमणुक करण्यात आली होती. त्यांचे जुलै व ऑगस्ट महिन्याचे काढलेल्या पगारापोटी व सप्टेबंर महिन्याची पुर्ण हजेरी लावून मस्टर पुढील मंजूरीसाठी गटविकास अधिकारी राजापूर यांचेकडे पाठविणेसाठी प्राथमिक आरोग्य केन्द्र, जवळेथर येथील वैदयकिय अधिकारी श्री. पुष्पक केरबा भिसे यांनी त्यांचेकडे रू. ५५००/- लाच रक्कमेची मागणी केली. म्हणुन तक्रारदार यांनी लोकसेवक श्री. पुष्पक भिसे यांचेविरूध्द ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी येथे लाचेच्या मागणीची तक्रार दिनांक २२/०९/२०२० रोजी दिलेली आहे.<br>सदर तकारीचे अनुषंगाने दिनांक २२/०९/२०१९ रोजी केलेल्या पडताळणी कारवाई मध्ये श्री.पुष्पक केरबा भिसे, वैदयकिय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केन्द्र, जवळेथर ता. राजापूर, जि. रत्नागिरी यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे जुलै व ऑगस्ट महिन्याचे काढलेल्या पगारापोटी व सप्टेबंर महिन्याची पुर्ण हजेरी लावून मस्टर पुढील मंजूरीसाठी गटविकास अधिकारी राजापूर यांचेकडे पाठविणेकरीता रू. ५,५००/- लाचेची मागणी केल्याचे व ती स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.<br>पडताळणीमध्ये निष्पन्न झालेनुसार लागलीच सापळा आयोजित केला असता, लोकसेवक श्री.पुष्पक केरबा भिसे, वैदयकिय अधिकारी यांनी तक्रारदार यांचेकडुन ५,५००/-रुपये लाचेची मागणी करून, मागणी केलेली लाच रक्कम तक्रारदार यांचेकडुन स्विकारल्यानंतर त्यांना दिनांक २२/०९/२०२० रोजी १७.४४ वा. प्राथमिक आरोग्य केन्द्र, जवळेथर ता. राजापूर, जि. रत्नागिरी येथे पंचासमक्ष रंगेहात पकडण्यात आले आहे. |

ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्याचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयाशी खालील कमाकावर संपर्क साधावा

Toll Free No :- 1064
Telephone No :- 02352/222893
Office email :- dyspacbratnagiri@mahapolice.gov.in
Website :- www.acbmaharastra.gov.in
Mobile App :- www.acbmaharastra.net
Facebook Page :- www.facebook.com/MaharastraACB

Dy. Supdt. of Anti Corruption Bureau
सत्यमेव जयते
RATNAGIRI

N.O.Ots
(निसर्ग ओतारी)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी